Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - V Issue-XI NOVEMBER 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

# वर्धा जिल्हयातील बदलत्या लोकसंख्येचा अभ्यास एक भौगोलिक अध्ययन

**प्रा. विश्वास प्रल्हाद खोब्रागडे**
स्व. निर्धनराव पाटिल वाघाये,
कला व विज्ञान महाविद्यालय, मुरमाडी/तुपकर

**सारांश :—**

संपूर्ण जगात लोकसंख्या वाढत आहे. कोणत्याही देशाची लोकसंख्या त्या देशातील मानवी संसाधन असते त्यावर त्या देशाची प्रगती अवलंबून असते. मानवी संसाधन कमी असेल तर त्या देशावर कोणताही देश आक्रमण करून त्या देशावर ताबा मिळावू शकतो. एखादया राष्ट्राच्या संरक्षणाकरिता लोकसंख्या महत्तवाचा घटक आहे. जगात जसजशी औद्योगिक क्रांती वाढली आहे. तसतसे लोकसंख्या अंतर्गत रचनेचा विकासात बदल झाला आहे. युरोप अमेरिका या खंडात लोकसंख्या वितरणाचा गंभीर बदल झाला आहे. मागील शतकात लोकसंख्या झपाट्याने वाढल्याने नागरीकरण वाढले. काळाच्या ओघाबरोबर लोकसंख्या वाढते दळणवळणाची साधने अधिक उपलब्ध होते. तेथेझपाट्याने लोकसंख्या रचनेत बदल होतो. तेथील लोकसंख्या वाढते शहराची निर्मिती होते. भारत देशात लोकसंख्येची वाढ अधिक आहे. परिणामी लोकसंख्येची जास्त आहे. त्यामुळे भारतीय लोकसंख्या घनता जास्त आहे. त्यामुळे भारतीय लोकसंख्या बदलाचे परिणाम गंभीर दिसून येतात लोकसंख्या बदलाचे अभ्यासाने या देशातील लोकसंख्येची वाढ कशी होते व किती टक्के होते याची माहिती सहज मिळते. वर्धा जिल्हा हा लोकसंख्येच्या बाबतीत महत्वपूर्ण जिल्हा असून या जिल्हयात लोकसंख्येची वाढ जलदगतीने होत आहे. लोकसंख्या वाढीचा परिणाम गंभीर स्वरूपाचा होत असून भारत देश स्वतंत्र झाल्यावर या जिल्हयात लोकसंख्येची वाढ अत्यंत कमी दिसून आले. परंतु १९७० च्या दशकापासून जिल्हयात लोकसंख्या वाढ जलद गतीने झाली आहे. त्यामुळे लोकसंख्येत बदल होऊन वर्धा जिल्हयात शहरीकरण वाढत आहे. लोकसंख्या बदलाचा अभ्यास करण्याकरिता लोकसंख्येची विस्तृत माहिती घेऊन त्याचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

**बिजसज्ञा—लोकसंख्या, लोकसंख्या बदल, शहरीकरण**

**प्रस्तावना :—** आशिया खंडातील चीन व भारत हे दोन असे राष्ट्र लोकसंख्येने जगात सर्वात मोठे आहेत. कारण दोन्ही देश लोकसंख्येच्या बाबतीत सर्वात मोठे देश आहे. चीन हा देश लोकसंख्येत प्रथम क्रमांकावर आहे. तर भारत हा देश लोकसंख्येत दुसऱ्या क्रमांकावर आहे. दोन्ही देशाच्या लोकसंख्येत मागील ४० वर्षात बदल झाले आहेत. एक लोकसंख्येची वाढ भरमसाठ झाल्याने भारत देशात लोकसंख्येचे गंभीर परिणाम दिसून येतात. भारत देशात लोकसंख्येचा विस्फोट होण्याची स्थिती निर्माण होऊ लागली आहे. लोकसंख्या बदलाचा अभ्यासाने आपणास मागील दशकात लोकसंख्येत काय बदल झाला? याची माहिती लोकसंख्या बदलाच्या अभ्यासाने मिळते. लोकसंख्येचा दृष्टीने अत्यंत कमी शहरीकरण झालेला वर्धा जिल्हा आहे. या जिल्हयात लोकसंख्येचा अभ्यास होणे आवश्यक आहे. कोणत्याही शहराच्या विकासाकरिता लोकसंख्या हा घटक अत्यंत महत्वाचा असतो. लोकसंखा बदलाच्या अभ्यासाने लोकसंख्येची वाढ व विकास कशी होत आहे याची माहिती मिळते. प्रस्तुत शोधपत्रिकेत वर्धा जिल्हयाच्या लोकसंख्या बदलाचा अभ्यास केलेला आहे. स्वातंत्र्यानंतर वर्धा जिल्हयात लोकसंख्येत काय बदल झाले व दशवार्षिक जनगणनेमध्ये लोकसंख्येत कोणता बदल झाला याचा अभ्यास या शोध पत्रिकेतून केले आहे.

Vol - V Issue-XI NOVEMBER 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

**अभ्यासक्षेत्र :—** वर्धा जिल्हा हा भारतातील महाराष्ट्र राज्यातील एक जिल्हा आहे. वर्धा नागपूर विभागातील एक महत्वपूर्ण जिल्हा आहे. भौगोलिक दृष्टिकोनातून या जिल्हयाचे स्थान ७५ अंश, ६०से उत्तर अक्षवृत ते ७८ अंश ६० से पूर्व रेखाशं या दरम्यान आहे. वर्धा जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्रफळ ६३०९ चौरस किलोमीटर आहे. वर्धा जिल्हा हा भौगोलिक ८ तालुके मिळून बसलेला आहे. या जिल्हयात वर्धा, देवळी, आर्वी, कारंजा, हिंगणघाट व समुद्रपूर हे तालुके महत्वाचे आहे. लोकसंख्येचा अभ्यास करताना सर्व तालुके अत्यंत महत्वाचे आहे. हा जिल्हा वर्धा नदीने परिपूर्ण आहे.२०११ च्या लोकसंख्या जनगणनेनुसार वर्धा जिल्हयाची लोकसंख्या १२,९७,१५७ आहे.

**माहितीचे संकलन व संशोधन पध्दती :—** प्रस्तुत शोध पत्रिकेचा अभ्यास करताना वर्धा जिल्हयातील लोकसंख्या बदलाचा शोध घेताना संकलित आकडेवारी १९६१ ते २०११ पर्यंतची आहे.माहिती द्वितीय माहिती स्त्रोतांवर आधारित आहे. लोकसंख्येची माहिती हे विविध कार्यालयातुन गोळा केली असून इंटरनेटचा उपयोग करण्यात आला आहे. शासकीय कार्यालय, तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय व विविध कार्यालयातून माहिती गोळा करण्यात आली आहे. या शोध पत्रिकेत संशोधन पध्दती व आकडेवारीचे विश्लेषण करण्याकरिता सांख्यिकीय पध्दतीने व आलेख पध्दतीने विश्लेषण केले असून विविध निष्कर्ष काढले आहेत.

**विषयाचा उद्देश :—**या शोधपत्रिकेचा उद्देश हा वर्धा जिल्हयातील १९६१ ते २०११ दरम्यान झालेल्या लोकसंख्या जनगणनामध्ये झालेल्या बदलाचा अभ्यास करणे आहे.

**महितीचे विश्लेषण :—** वर्धा जिल्हयात स्वातंत्र्यपूर्वी लोकसंख्या कमी आढळून येते. वर्धा जिल्हयाचा लोकसंख्येचा अभ्यास केल्यावर असे लक्षात येते की, वर्धा जिल्हयाची लोकसंख्या स्वतंत्रतापूर्वी अत्यंत कमी होती. भारत स्वतंत्र झाल्यावर वर्धा जिल्हयाच्या लोकसंख्येत तीव्र स्वरूपात बदल घडले आहे. वर्धा जिल्हयात इ.स.१९५१ ते १९७१ या वर्षामध्ये लोकसंख्येचा दर हा अधिक असल्याचे आढळते.

**सारणी क्र.१ :—वर्धा जिल्हा लोकसंख्या** (१९७१ ते २०११)

| अ.क्र. | जनगणना वर्ष | लोकसंख्या |
|---|---|---|
| १. | १९६१ | ६,३४,२७७ |
| २. | १९७१ | ७,७९,५६२ |
| ३. | १९८१ | ९,२६,६१६ |
| ४. | १९९१ | १०,६७,३५७ |
| ५. | २००१ | १२,९६,१५७ |

स्त्रोत डीस्ट्रीक्ट सेन्सस हॅडबूक, वर्धा




X-Axis :- Represented Population in lakhs Y-Axis :- Population year

वरील सारणी चा अभ्यास केला असता असे दिसून येते की वर्धा जिल्हयात १९६१ या वर्षामध्ये लोकसंख्या ७,३४,२७७ होती. १९७१ या वर्षामध्ये लोकसंख्येत वाढ होऊन लोकसंख्या १०,६७,३५७ एवढी झाली. १९९१ या वर्षीच्या जनगणनापासून लोकसंख्येत झपाटयाने वाढ होऊन

२००१या वर्षी १२,९६,१५७ लोकसंख्या झाल्याचे आढळते. २०११ यावर्षी लोकसंख्येत मोठी वाढ होऊन १३,००,७७४ एवढी लोकसंख्या झाली. सुमारे ५० वर्षात लोकसंख्या दुप्पट झाली असून लोकसंख्येत मोठा बदल निर्माण झाला आहे. वर्धा जिल्हयातील प्रत्येक दहा वर्षात लोकसंख्येत वाढझाली आहे.

सारणी क्र. २ :— **वर्धा जिल्हा लोकसंख्या बदल**

| **अ. क्र.** | **जनगणना वर्ष** | **लोकसंख्या** | **वाढलेली लोकसंख्या** | **लेकसंख्या बदल (:)** |
|---|---|---|---|---|
| १ | १९६१ | ६,३४,२७७ | | |
| २ | १९७१ | ७,७९,५६२ | १,४५,२८५ | १८.६३: |
| ३ | १९८१ | ९,२६,६१६ | १,४७,०५४ | १५.८७: |
| ४ | १९९१ | १०,६७,३५७ | १,४०,७४१ | १३.१८: |
| ५ | २००१ | १२,९६,१५७ | २,२८,८०० | १७.६५: |

स्त्रोत— डीस्ट्रीक्ट सेन्सस हॅडबूव, वर्धा




वरील सारणीच्या अभ्यासाने असे दिसून येते की, वर्धा जिल्हयात १९७१ यावर्षी लोकसंख्यकेत १८.६३ टक्के वाढझाली असून लोकसंख्या सुमारे १,४५,२८५ एवढी लोकसंख्या दहा वर्षात वाढली आहे. १९८१ यावर्षी लोकसंख्येची वाढ १५.८७ टक्के सुमारे १,४७,०५४ एवढी लोकसंख्या वाढली आहे. १९९१ यावर्षी सुमारे १३.१८ टक्के वाढझाली असून १,४०,७४१ एवढी लोकसंख्या वाढली आहे. १९९१ यावर्षी लोकसंख्या वाढ कमी प्रमाणात झाल्याचे आढळून आले आहे याचे मुख्य कारण म्हणजे कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम सुरू करण्यात आला होता. २००१ यावर्षी लोकसंख्या सुमारे १७.६५ टक्के वाढ होऊन २,२८,८०० एवढी लोकसंख्या वाढली आहे असे दिसते. वर्धा जिल्हयातील सर्व तालुक्यात १९६१ या वर्षापासून दर दहा वर्षात लोकसंख्या वाढीत बदल झालेला आहे.

**वर्धा जिल्हा लोकसंख्या बदलातील ठळक बाबी :—**

वर्धा जिल्हयात लोकसंख्या बदलाचा अभ्यास करताना विविध बाबी दिसतात. वर्धा जिल्हा हा वर्धा नदीच्या भौगोलिक प्रदेशात असलेला जिल्हा आहे. भौगोलिक दृष्टीने जिल्हयातील तालुके अत्यंत दुर्मिळ भागात आहे. या सर्वाचा येथील लोकसंख्येवर परिणाम झाला आहे. भारतीय स्वातंत्र्यतर कालखंडात जिल्हा अविकसित होता. औद्योगिक दृष्टया हा जिल्हया अजूनही

अविकसित जिल्हा आहे. हिंगणघाट तालुका जर सोडला इतर तालुक्यात फार मोठे औद्योगीकरण झालेले आढळून येत नाही. लोकसंख्येची वाढ ज्या प्रमाणात पाहिजे त्या प्रमाणात झाली नाही असे दिसून येते. वाढते स्थलांतर व उद्योगधंदयाची कमतरता यामुळे लोकसंख्येतील बदल १८ टक्के चे वर झालेला आढळत नाही. लोकसंख्या बदलामुळे वर्धा जिल्हयातील लोकसंख्या थोडयाफार प्रमाणात वाढत असून हा एक सर्वात मोठा वर्धा जिल्हयात झालेला बदल आहे.

**निष्कर्ष :—**

प्रस्तुत शोध पत्रिकेचा अभ्यास करताना असे निष्कर्ष निघतात की, वर्धा जिल्हयातील लोकसंख्या बदल १९७१ ते २००१ या वर्षापर्यंतच्या जनगणनेत वर्धा जिल्हयाच्या लोकसंख्यमध्ये वाढझाली आहे. लोकसंख्येत वाढ होण्याची स्थिती १९७१ ते २००१ पर्यंत १३ टक्केच्या वर आहे. १९७१ ते २००१ या दशकात लोकसंख्येत निरंतर वाढ होत आहे असे दिसून येते.

**उपाय योजना :—**

प्रस्तुत शोध पत्रिकेचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, वर्धा जिल्हयाची लोकसंख्या बदलाची आताची स्थिती स्वातंत्रपूर्वी पेक्षा वेगळी आहे. वर्धा जिल्हयात उद्योजक निर्माण केले तर स्थानिक स्थलांतर थांबविण्यासाठी आवश्यक ठरेल. वर्धा जिल्हयातील इतर तालुके हे विकासात बरेच मागे असून येथे लोकसंख्या वाढीचा दर वाढण्याची दाट शक्यता आहे. हिंगणघाट येथे उद्योगांची स्थापना झाली व पुलगाव येथील ऑर्डनन्स फॅक्टरीची निर्मिती झाली असल्याने येथील लोकसंख्या रचनेत बदल परिणामकारक ठरले लोकसंख्या बदलाने वर्धा जिल्हयात शासनाने विविध उपक्रम राबविले तर बरेच प्रश्न सुटतील.

**संदर्भ ग्रंथ :—**

१) घारुरे डॉ. विठ्ठल(२००२)लोकसंख्या भुगोल प्रकाशक, पिंपळापुरे प्रकाशन
२) घारपुरे डॉ. विठ्ठल(२०१८)महाराष्ट्राचा भूगोल प्रकाशक, पिंपळापुरे प्रकाशन
३) वर्धा जिल्हा जनगणना पुस्तिका (१९६१) प्रकाशक, संचालक सरकारी मुद्रण व लेखन सामग्री महाराष्ट्र शासन मुंबई
४) वर्धा जिल्हा जनगणना पुस्तिका (१९७१) प्रकाशक,Director of censusoperation Maharashtra
५) वर्धा जिल्हा जनगणना पुस्तिका(१९८१)प्रकाशक, संचालक सरकारी मुद्रण व लेखन सामग्री महाराष्ट्र शासन मुंबई
६) वर्धा जिल्हा जनगणना पुस्तिका (१९९१)प्रकाशक, संचालक सरकारी मुद्रण व लेखन सामग्री महाराष्ट्र शासन मुंबई
७) वर्धा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन (२००१) प्रकाशक, जिल्हा सांख्यिकी कार्यालय अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन.